**स्थायी निदेश क्र. १७**

राज्यातील नगरपरिषदांकडून सक्तीचे व ऐच्छिक तसेच मंजूर उपविधीनुसार वसूल करावयाचे कर/शुल्क इत्यादींची वसुली.

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र:नपसु १०२२/प्र.क्र.११२/२००२/६**
**दिनांक: ३ जून, २००२**

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे वतीने राज्यातील नगरपरिषदांच्या वार्षिक तपासणी कार्यक्रमांतर्गत केलेल्या तपासणीत कांही नगरपरिषदांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १०५ व १०८ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने लागू केलेले सक्तीचे व ऐच्छिक करानुसार तसेच उक्त अधिनियमाचे कलम ३२२ नुसार नगरपरिषदेने मंजूर केलेल्या उपविधीतील तरतुदीप्रमाणे वसुल करावयाचे कर व फी इत्यादी लागू न करणे, त्यांची आकारणी न करणे तसेच वसुलीची कार्यवाही न करणे अशा प्रकारच्या गंभीर त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

०२. काही नगरपरिषदांकडून या महत्वाच्या उत्पन्नाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे अशा नगरपरिषदांना फार मोठया उत्पन्नापासून वंचित रहावे लागलेले आहे व आर्थिक नुकसान झालेले आहे, असे यापुढे घडू नये म्हणून सर्व नगरपरिषदांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

०३. नगरपरिषदांच्या उत्तम आर्थिक व्यवस्थापनाकरिता शासनाने लागू केलेल्या सर्व सक्तीच्या व ऐच्छिक करांची / शुल्कांची तसेच नगरपरिषदांनी मंजूर केलेल्या उपविधीनुसार नगरपरिषदांनी वसुलात आणावयाच्या रकमेची सर्व प्रकारची वसुली १०० टक्के करावी. या कामी यापुढे दुर्लक्ष झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल व अशा होणाऱ्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबंधित पदाधिकारी व अधिकारी यांच्यावर निश्चित केली जाईल.

०४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ अन्वये मुख्याधिकाऱ्यांनी प्रतिवर्षी नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सभागृहापुढे सादर करतांना लागू करण्यांत आलेले सक्तीचे व ऐच्छिक कर व शुल्कांबाबत तसेच नगरपरिषदेला आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या मंजूर उपविधीचा सविस्तर तपशील सादर करावा. असा अहवाल सादर करतांना प्रत्येक कराचे व शुल्कांचे किमान व कमाल दर तसेच नगरपरिषदेने आकारलेले दर याची माहिती सभागृहाला द्यावी व यामधून विहित मर्यादेपर्यंत दरवाढ करुन नगरपरिषदेच्या उत्पन्नात किती भर पडू शकेल याबाबतचा सुस्पष्ट प्रस्ताव मुख्याधिकारी यांनी सादर करावा.

नगरपरिषदेने मंजूरी दिलेल्या अर्थसंकल्पाची जिल्हाधिकारी यांचे वतीने मंजूरी देणेकामी छाननी करतेवेळी वरीलप्रमाणे मुख्याधिकारी यांनी अर्थसंकल्पासोबत अहवाल / प्रस्ताव सादर केलेला आहे अगर कसे याची खातरजमा यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी करावी, अशी त्यांना विनंती आहे.

०५. नगरपरिषदेच्या वतीने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचयती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १०५ व १०८ अन्वये विहित करांचे व शुल्कांचे तसेच उक्त अधिनियमाचे कलम ३२२ अन्वये उत्पन्नाशी संबंधित

उपविधीद्वारे प्राप्त होणारे उत्पन्नास नगरपरिषदेस वंचित ठेवण्यांत आल्यास त्याची जबाबदारी असे निर्णय घेणे ज्यांचे कायद्यातील तरतुदीन्वये कर्तव्य आहे त्यांच्यावर राहील. अशा झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाईपण संबंधितांकडून करणे आवश्यक ठरेल याचीही सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,
१. अध्यक्ष, नगरपरिषद (सर्व)
२. मुख्याधिकारी नगरपरिषदा (सर्व)
३. जिल्हाधिकारी - मुंबई व बृहन्मुंबई वगळून (सर्व)

प्रत माहितीसाठी अग्रेषित :
१. मा.सचिव, नगर विकास विभाग, मुंबई
२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, सर्व
३. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
४. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर